(८६)

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

नियोजन खाते, मध्यवर्ती कार्यालय,

महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई - ४०० ००८

दूरध्वनी क्रं.-२३०२३९०० Website:- www.msrtc.gov.in फॅक्स :-२३०१२३०८.

क्र.राप/नियो. व पणन/ ७९२ **महत्वाचे** दि. ०३.०३.२०१५.

**नियोजन व पणन खाते परिपत्रक क्र. १ /२०१५**

**मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/मह.व्यवस्थापक (यं.अ.)/महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)/ महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (आवेदन)/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/ उपमहाव्यवस्थापक (मा. व तं.)/ मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य सांख्यिकी अधिकारी / सचिव, रा.प.महामंडळ/मा. अध्यक्ष यांचे स्विय सचिव/उपा.व व्य.सं यांचे स्विय सचिव / सहा.जनसंपर्क अधिकारी यांस . . .**

**विषय** : खाते / शाखांकडून संरचना व कार्यपध्दतीमध्ये करावयाच्या बदलाबाबत परस्पर प्रस्ताव सादर न करणेबाबत.

*******

नियोजन व पणन खात्याचे कामकाजामध्ये महामंडळाची संरचना व कार्यपध्दती यासंबंधीचे कामकाज अंतर्भुत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने संरचना व कार्यपध्दतीचे कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेऊन तसेच इतर खात्यांकडून प्राप्त होणा-या प्रस्तावांची छाननी करून संशोधनाअंती त्यामध्ये आवश्यकतेनुसार कालानुरुप बदल सुचित करणे या बाबींचा समावेश आहे.

**संरचना व कार्यपध्दतीअंतर्गत कामे एका खात्याकडे सोपविण्याचा मूळ उद्देश म्हणजे, '' खात्यांचे व पदांचे नावात बदल करताना खातेनिहाय अस्तीत्वात असलेल्या खात्यांची व पदांची तुलना करून नावात बदल करताना दर्जामध्ये बदल होऊ नये म्हणून समांतर व ऊर्ध्ववर्ती तुलना करणे , कामाचे स्वरूप /निकड विचारात घेऊन पदे मंजूर करणे/ पदे गोठविणे/पुनर्जिवित करणे, खात्यांचे / शाखांचे कामाची पुनर्रचना करणे, अधिकारांचे केंद्रीकरण / विकेंद्रीकरण करणे, शाखांचे इतर खात्यात विलीनीकरण / विकेंद्रीकरण करणे , अशा प्रकारची संरचना करताना खात्यामधील समन्वय असंतुलीत होणार नाही याची दक्षता घेणे ''हा आहे.** या सर्व बाबींचा सारासार विचार करून महामंडळाच्या संरचनेत सुसुत्रता राहण्याचे दृष्टीने संबंधीत खाते/शाखांनी रितसर नियोजन खात्यामार्फत नस्ती प्रगत करुन सक्षम प्रांधिकारी यांची मंजूरी झाल्यानंतर आवश्यकतेनुसार प्रस्ताव संचालक मंडळासमोर ठेवणे अभिप्रेत व आवश्यक आहे. तथापी, याप्रमाणे कार्यवाही होत नसून काही खाते/शाखांकडून सक्षम प्राधिकारी यांची थेट मंजुरी घेऊन आवश्यकतेनुसार प्रस्ताव संचालक मंडळासमोर ठेवले जातात . परिणामी प्रशासकीय गुंतागुंत किंवा पेच निर्माण होऊन परस्पर खात्यामधील समन्वयाचा अभाव दिसून येतो.

कामकाजात समन्वय व सूसुत्रता राहण्याचे दृष्टीने सुचित करण्यात येते की, **संरचना व कार्यपध्दतीअंतर्गत** कोणत्याही बाबतीत बदल करावयाचा झाल्यास त्याबाबतचा प्रस्ताव नियोजन व पणन खात्यामार्फतच प्रगत करण्यात यावा.

Bhandare

**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

D:\Panan-MKT\Letter to RM.docx

**प्रत माहिती व वरीलप्रमाणे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.**

१) प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर प्रदेश.

२) विभाग नियंत्रक, रा.प. मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ विभाग.

**महाव्यवस्थापक ( नियोजन व पणन )**

D:\Panan-MKT\Letter to RM.docx

(५४)

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

नियोजन व पणन खाते ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई - ४०० ००८
दूरध्वनी क्रं.-२३०२३९०० gmplanning@rediffmail.Com. फॅक्स् :- २३०८६३५२

क्र. राप/नियोजन व पणन/३८५ परिपत्रक क्र. 2 /२०१५ दिनांक:०४/०४/२०१५.

प्रति,

प्रादेशिक व्यवस्थापक,

म.रा.मा.प.महामंडळ, औरंगाबाद/पुणे / नागपूर /मुंबई/ नाशिक/अमरावती प्रदेश

विभाग नियंत्रक,

म.रा.मा.प.महामंडळ, औरंगाबाद / बीड / जालना/ लातूर/ नांदेड / परभणी / उस्मानाबाद / मुंबई / पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / ठाणे/भंडारा / चंद्रपूर / गडचिरोली/नागपूर /वर्धा /कोल्हापूर / पुणे / सांगली / सातारा / सोलापूर / अहमदनगर /धुळे /जळगाव / नाशिक /अकोला /अमरावती /बुलढाणा /यवतमाळ .

विषय:- विविध प्रसंगी प्रसिध्द करण्यात येणा-या जाहिरातींमधून रा.प. ची व्यावसायिक प्रसिध्दी करणेबाबत.

****

रा.प.महामंडळाने राज्याच्या कानाकोप-यात खेडोपाडी, दुर्गम भागातील प्रवाशांना सेवा पुरवून महाराष्ट्राच्या विकासास हातभार लावलेला आहे हे सर्वश्रुत आहेच. एस.टी. द्वारे पुरविण्यात आलेल्या सेवेमूळे ही वाहतूक संस्था ''एस.टी'' ह्या नावाने जनमानसात प्रचलीत झालेली आहे. महामंडळाकडून प्रवाशांना पुरविण्यात येणा-या सेवांची वेगळी प्रसिध्दी देण्याची गरज यापुर्वी भासत नसली तरी सध्याच्या स्पर्धात्मक युगात वावरताना आपल्या सेवेची गुणवत्ता ग्राहकांपर्यंत (प्रवाशांपर्यंत) वेळोवेळी पोहचविणे ही काळाची गरज आहे. ही गरज विचारात घेता सध्या महामंडळाच्या बसस्थानकावरून उद्घोषणेद्वारे रा.प. सेवांची प्रसिध्दी करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून महामंडळाने पहिल्यांदाच सी.एस.टी. रेल्वेस्थानकावरून होर्डींग्जद्वारे जाहिरात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## सेवा जाहिरातीच्या नविन संकल्पना:-

रा.प. महामंडळाद्वारे सध्या वाहतूक खात्यामार्फत वाणिज्य आस्थापना परवाना धारक निवडीबाबत, स्थापत्य अभियांत्रिकी खात्यामार्फत विविध प्रकारच्या बांधकामांसाठी, भांडार व खरेदी खात्यामार्फत मालाच्या खरेदीसाठी, कर्मचारीवर्ग खात्याकडून कर्मचारी भरतीसाठी अशा अनेक विषयांसाठी मध्यवर्ती कार्यालये / घटक कार्यालये अशा विविध स्तरावरून निविदा व स्वारस्य अभिव्यक्ती सूचनांचे स्वरूपात विविध वृत्तपत्रांमधून जाहिराती दिल्या जातात.

सर्व जाहिराती त्या त्या वृत्तपत्राने विहीत केलेल्या दरआकारणीनुसार आकार भरून केल्या जातात. परंतू महामंडळ करत असलेल्या व्यवसायाचे दृष्टीने प्रवाशांना देण्यात येणा-या सेवा , सुविधांबाबत कोणत्याही प्रकारची जाहिरात केली जात नाही.

प्रस्तावित संकल्पनेप्रमाणे सेवा सुविधांचे जाहिरातीकरीता अतिरीक्त खर्च न करता सध्या महामंडळाच्या विविधस्तरावरून ज्या निविदा/ जाहिराती व स्वारस्य अभिव्यक्ती सूचनां प्रसिध्द होतात त्या जाहिरातींची जी चौकट असते त्या चौकटीच्या खालच्या ठळक रेषेवर रा.प. महामंडळाची मुद्रा (मोनोग्राम) व खास नाविण्यपुर्ण अशी विविध प्रकारची घोषवाक्य (टॅगलाईन), ई-तिकीटासाठी व अन्य सेवा सुविधांसाठी संकेतस्थळ , फेसबुक संपर्कस्थळ अशी विविध प्रकारची माहिती , प्रसिध्दीस दिल्यास स्वतंत्र जाहिरात न करता महामंडळाची व्यावसायिक जाहिरातदेखिल होऊ शकेल. अशा प्रकारच्या जाहिराती अनेक इतर खाजगी/ शासकिय व्यावसायिक जाहिरातींमधून प्रसिध्द होत असतात. **या धर्तीवर सोबत उदाहरणादाखल काही घोषवाक्य देण्यात आहेत.**

या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपणामार्फत वेळोवेळी देण्यात येणा-या जाहीरातींमध्ये सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील वरील प्रकारची घोषवाक्ये प्रसिध्द करण्यात यावीत. अशा प्रकारची घोषवाक्य प्रसिध्दीस देताना प्रत्येक वेळी वेगळ्या प्रकारचे घोषवाक्य देण्यात यावे. हे टरविताना शक्यतो प्रसंगानुरूप / कालानुरूप महत्व विचारात घेऊन त्या घोषवाक्यास प्रसिध्दी द्यावी. उदा. प्रवासी गर्दिचा हंगाम असेल तर आगाऊ आरक्षणासाठी " **www.msrtc.gov.in** " या रा.प. संकेत स्थळाची माहिती देणे. कमी गर्दिचा हंगाम असेल तर " **एस.टी. चा प्रवास, राज्याचा विकास**"अशा प्रकारच्या घोषवाक्यांची प्रसिध्दी देणे.

तरी वरील सूचनांची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी व यापुढे कोणतीही जाहिरात वरीलप्रकारची घोषवाक्य असल्याशिवाय प्रसिध्दीला दिली जाणार नाही याची खातरजमा करण्यात यावी.

तसेच अशा प्रकारची परिणामकारक घोषवाक्य तयार करण्याबाबत विभागिय स्तरावरून सुचना मागविण्यात याव्यात. प्राप्त सूचनांची छाननी विभागिय स्तरावर करण्यात यावी. जाहिरातीचे दृष्टीकोनातून परिणामकारक वाटणा-या घोषवाक्यांची यादी या कार्यालयास पाठविण्यात यावी. या कार्यालयामार्फत आपणाकडून प्राप्त घोषवाक्यांची छाननी करण्यात येईल व अंतिम निवड केलेल्या घोषवाक्यांची यादी आपणास पाठविण्यात येईल. तदनंतर सदरची यादी व सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील घोषवाक्यांना वर दिलेल्या सूचनांप्रमाणे जाहिरातीमधून प्रसिध्दी देण्यात यावी.

परिपत्रकाची पोहोच देण्यात यावी.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**प्रत रवाना:-** मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भांवख) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / महाव्यवस्थापक (वाहतूक ) / महाव्यवस्थापक (आवेदन)रा.प. प्रा.का.पुणे/उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग) / मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य सांख्यिकी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.तं.) / उपमहाव्यवस्थापक (विधि ) / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/अध्यक्ष,यांचे स्वीय सचिव /उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांचे वैयक्तिक सचिव / सहा. जनसंपर्क अधिकारी यांना माहिती व वरीलप्रमाणे कार्यवाहीसाठी.

महाव्यवस्थापक (यं.अ.) / महाव्यवस्थापक (वाहतूक ) यांना कळविण्यात येते की, अशाच प्रकारची घोषवाक्ये रा.प. वाहनांची बांधणी करताना वाहनांचे दर्शनीय भागात स्टिकरच्या स्वरूपात प्रदर्शित करणे, ई-तिकटांवर सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील घोषवाक्ये दर्शनी भागात प्रसिध्दीस देण्यात यावित. तसेच प्रसंगानुरूप ( उदा. नववर्ष शुभेच्छा, दिपावली/ गुढीपाडवा अशा भारतीय विविध सणांच्या शुभेच्छा ) घोषवाक्य प्रदर्शित करण्यात यावित.

तसेच रा.प. महामंडळाच्या बसस्थानकावरून ज्या इतर खाजगी संस्थाच्या जाहिराती ( होर्डींग्ज, फलक, भित्तीपत्रके ) प्रसिध्द केल्या जातात त्या जाहिरातीमधून अशा प्रकारची घोषवाक्य टाकणे त्यांना बंधनकारक करणे बाबत तपासणी अंती त्यांचेकडून कार्यवाही करणे.

तसेच सहाय्यक जनसंपर्क अधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यांचेकडे विविध खात्यांकडून प्रसिध्दीसाठी पाठविण्यात येणारी प्रसिध्दीपत्रके प्रसिध्दीस देताना त्यामध्ये वर नमुद सूचनांप्रमाणे सोबतच्या यादीतील घोषवाक्य समाविषट करण्यात यावित.

**प्रत रवाना :-** उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) , रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी पुणे यांना माहिती व वरीलप्रमाणे कार्यवाहीसाठी.

**प्रत रवाना :-** कार्यशाळा व्यवस्थापक , म.रा.मा.प.महामंडळ दापोडी-पुणे / नागपूर/ औरंगाबाद यांना माहिती व वरीलप्रमाणे कार्यवाहीसाठी.

**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

| अ.क्र. | घोषवाक्ये | |
|---|---|---|
| १ | एस.टी. चा प्रवास, राज्याचा विकास. | |
| २ | सार्वजनिक हितासाठी सज्ज हे एस. टी. प्राधिकरण- | |
| ३ | निश्चित व निश्चिंत प्रवासासाठी केवळ एस.टीच. | |
| ४ | ऑन लाईन आरक्षणासाठी संकेत स्थळ www.msrtc.gov.in. | |
| ५ | ५० दिवसाचे भाडे भरा व तीन महिने प्रवास करा. | |
| ६ | २० दिवसाचे भाडे भरा व ३० दिवस प्रवास करा. | |
| ७ | एस.टी आली गावाला, जाईन आता मी शाळेला. | |
| ८ | एस.टी गावात आली अन् मुलींची प्रगती झाली. | |
| ९ | प्रवासासाठी आहे ना एस.टी, आता नाही मी एकटी. | |
| १० | वाट पाहीन पण एस.टी. नेच जाईन. | |
| ११ | तिर्थक्षेत्रांची यात्रा घडवते आपली एस.टी. | |
| १२ | एस. टी. आपली आहे,तिची स्वच्छता राखू या. | |
| १३ | एस.टी. राष्ट्राची संपत्ती आहे,तिचे जतन करू या. | |
| १४ | Moving Toward Development | |
| १५ | Help us to help you. | |
| १६ | We are ready to change to serve you better. | |
| १७ | S.T. stands for Safe Travel. | |
| १८ | S.T. Bridges the distance. | |

(६२)


# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,

## नियोजन व पणन खाते,

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई -४०० ००८

दूरध्वनी क्रं. २३०२३९०० gmplanning@rediffmail.Com. फॅक्स क्रं. २३०२३८६३५२


**परिपत्रक क्र. ३/२०१५**

क्र.राप/निवप/प्रशि/५८६ दि. २४/०६/२०१५

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (भांवख)/उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग ) /उपमहाव्यवस्थापक (विधि)/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं )/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक/ सचिव, म.रा. मा. प. महामंडळ/मुख्य कामगार अधिकारी/ मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी (से. मं.)/ सहाय्यक जनसंपर्क अधिकारी/

अध्यक्ष, म.रा.मा.प. महामंडळ,यांचे स्वीय सचिव यांस,

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म. रा. मा.प. महामंडळ,यांचे वैयक्तिक सचिव यांस,

महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प प्रादेशिक कार्यालय, पुणे

**प्रादेशिक व्यवस्थापक, म. रा.मा.प. महामंडळ** औरंगाबाद/पुणे/नागपूर/मुंबई/नाशिक/अमरावती

**उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)** , रा. प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी पुणे

**कार्यशाळा व्यवस्थापक, म. रा. मा.प. महामंडळ** दापोडी-पुणे/नागपूर/औरंगाबाद

**कार्यकारी अभियंता** ,रा .प. मुंबई/(कुर्ला)/पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती.

**विभाग नियंत्रक, म. रा. मा. प. महामंडळ.** औरंगाबाद/बीड/जालना/ लातूर/ नांदेड/ परभणी/ उस्मानाबाद/ मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/नागपूर/वर्धा/कोल्हापूर/ पुणे/ सांगली/ सातारा/सोलापूर/अहमदनगर/धुळे/जळगाव/नाशिक/अकोला/अमरावती/बुलढाणा/ यवतमाळ.

**विषय :- रा. प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी, पुणे येथे प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण कालावधीतील निवास व भोजन शुल्काबाबत.**

****

रा. प. महामंडळातील कर्मचारी , पर्यवेक्षक आणि अधिकारी यांना मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी, पुणे येथे सेवापूर्व व उजळणी प्रशिक्षण देण्यात येते. या ठिकाणी त्यांचे निवास व भोजनाची व्यवस्था असून त्यासाठी शुल्क आकारले जाते त्याचप्रमाणे बाहय संस्थांकडून रा. प.अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. त्याचा खर्च महामंडळाकडून केला जातो मात्र नव्याने सेवापूर्व प्रशिक्षणासाठी येणाऱ्या व रा .प सेवेमध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवापूर्व व उजळणी प्रशिक्षण देणे या बाबी महामंडळाच्या कामकाजातील महत्वाचा भाग असून, महामंडळाचे हितास्तव आहेत. हे लक्षात घेता, त्यांचेकडून आकारण्यात येणारे निवास व भोजनाचे शुल्क माफ करण्यात यावे, यासाठी प्रस्ताव महामंडळासमोर ठेवण्यात आला. या अनुषंगाने तसेच, याच धर्तीवर रा. प. महामंडळामध्ये विविध कर्मचारी प्रवर्गात नव्याने भरती होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवापूर्व प्रशिक्षण कालावधीत दयावयाच्या भत्याबाबत संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा झाली त्यानुसार, **महामंडळ ठराव क्र. २०१५ : ०३ : १०** दि. ०५.०३.२०१५ अन्वये ठराव पारित करण्यात आला.त्या अनुषंगाने पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत, त्यानुसार कार्यवाही करावी.

१. रा. प. महामंडळामध्ये विविध कर्मचारी प्रवर्गात नव्याने भरती होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवापूर्व प्रशिक्षण दिले जाते अशा सर्व प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण कालावधीमध्ये सध्या जो भत्ता दिला जातो त्याऐवजी त्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना त्या-त्या वेळी अनुज्ञेय असलेला दैनिक भत्ता अदा करण्यात यावा व प्रशिक्षणाकरिता येण्या-जाण्यासाठी दैनिक कर्तव्यार्थ मोफत पासाचे धर्तीवर पास देण्यात यावा.

२. सरळसेवा भरतीद्वारे निवड झालेल्या अधिकारी /कर्मचारी यांचे म. प्र. संस्था भोसरी, पुणे येथे होणाऱ्या सेवापूर्व प्रशिक्षण कालावधीत निवास व भोजनाच्या व्यवस्थेसाठी कोणतेही शुल्क दि. २२.०९.२०१४ पासून आकारु नये.

३. रा. प. महामंडळातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना म. प्र. सं. भोसरी, पुणे येथील उजळणी प्रशिक्षण कालावधीत निवास व भोजन व्यवस्थेपोटी आकारण्यात येणारे शुल्क न आकारता प्रत्यक्ष प्रशिक्षण कालावधीतील दैनिक भत्त्याची रक्कम सेवाविनीयम १२८ मधील टिप-४ चे अधिन प्रचलीत पध्दतीनुसार सन २०१५ -१६ या आर्थिक वर्षापासून अदा करावी.

म. प्र. सं. भोसरी, पुणे येथे वरीलप्रमाणे रा. प. अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणासाठी होणारा भोजन व निवासापोटीचा खर्च, सद्यस्थितीत कर्मचाऱ्यांचे वेतन, व्याख्यात्यांचे मानधन इ. खर्चासाठी निधी विहीत प्रचलीत कार्यपध्दतीप्रमाणे लेखा खात्याकडून पुरविण्यात येईल.

सदर परिपत्रक कर्मचारी वर्ग खाते व लेखा खाते यांचे संमतीने प्रसारीत करण्यात येत आहे.

Khandare

**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

(64)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
नियोजन व पणन खाते ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई - ४०० ००८
दूरध्वनी क्रं.-२३०२३९०० Website:- www.msrtc.gov.in फॅक्स् :- २३०८६३५२

**परिपत्रक क्र. 8 /२०१५.**
क्र.राप/निवप/प्रशा/ ८६५ दि.१८/०९/२०१५.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक (वाह.)/महाव्यवस्थापक (यंअ)/ उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग )/महाव्यवस्थापक (भांवख)/उप महाव्यवस्थापक(माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक/कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/मुख्य कामगार अधिकारी/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/सचिव, रा.प.महामंडळ/ सहा.जनसंपर्क अधिकारी/सचिव,म.रा.मा.प.महामंडळ/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक/मा. अध्यक्ष म.रा.मा.प.महामंडळ

**प्रादेशिक व्यवस्थापक रा.प. प्रादेशिक कार्यालय,** रा.प. महामंडळ,मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर.
**कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा,** दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी पुणे.
**विभाग नियंत्रक,रा.प. महामंडळ**--मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

**विषय**:- वर्ग-१ व वर्ग-२ (वरिष्ठ/कनिष्ठ) अधिकाऱ्यांना पारपत्रासाठी (पासपोर्ट) ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेबाबत.

****

रा .प. महामंडळातील वर्ग-१ वर्ग-२ (वरिष्ठ/कनिष्ठ) अधिकाऱ्यांना परदेशात प्रवासासाठी ''पारपत्र'' (पासपोर्ट) देण्यासाठी ''ना हरकत प्रमाणपत्र'' आवश्यक आहे. ते सध्या सक्षम प्राधिकारी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या स्वाक्षरीनें दिले जाते. तथापि, सदर प्रक्रियेस उशिर होऊन प्रमाणपत्र संबंधितांना मिळण्यास बराच कालावधी निघून जातो.

आता पारपत्रासाठी आवश्यक ''ना हरकत प्रमाणपत्र'' देण्याचे काम अधिक जलद व्हावे म्हणून प्रस्तावित नियमात बदल करुन, या कामाचे विकेंद्रीकरण करण्यात येत आहे. या परिपत्रकाद्वारे ''ना हरकत प्रमाणपत्र'' देण्याचे अधिकार महाव्यवस्थापक (क. व .औ.सं.) यांची नियुक्ती होईपर्यंत किंवा या संदर्भात पुढील आदेशापर्यंत सदरचे अधिकार उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग) यांचेकडे प्रदान करण्यात येत आहेत.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मीना
(Sd/- signed by VC&MD)

D:\Delegation folder:Delegation of powers of VC&MD to FA&CAO.doc.doc